# मेट्रो ३ मधील चार स्थानके तयार

म. टा. खास प्रतिनिधी, मुंबई



मेट्रो ३ या राज्यातील पहिल्या भूमिगत मेट्रो प्रकल्पातील चार स्थानके पूर्ण झाली आहेत. त्यामध्ये चर्चगेट, विद्यानगरी, बीकेसी आणि वरळी यांचा समावेश आहे. या स्थानकांच्या छायाचित्रासह ही माहिती मेट्रो ३ प्रशासनाने ट्विटरवर जारी केली आहे.

मेट्रो-३ हा प्रकल्प मुंबईच्या पश्चिम उपनगरांना उत्तर-दक्षिण जोडतो. हा पूर्णपणे भुयारी मार्ग असून, त्यात एकूण २७ स्थानके आहेत. उत्तरेला सारिपूतनगर (आरे कारशेड) ते दक्षिणेला कफ परेडपर्यंत ही मार्गिका आहे. यापैकी कफ परेड हे स्थानक जमिनीवर आहे. तर सारिपूतनगर हे आरे कारशेडसाठीचे रॅम्प स्थानक आहे. या मार्गिकेचा पहिला टप्पा सारिपूतनगर ते बीकेसी उत्तर (प्राप्तीकर कार्यालय) असा असून, तो डिसेंबर २०२३मध्ये सुरू होणार आहे. तर दुसरा टप्पा बीकेसी दक्षिण ते कफ परेड असेल. हा टप्पा डिसेंबर २०२४मध्ये सुरू केला जाणार आहे.

मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड ही विशेष कंपनी हा प्रकल्प उभा करीत आहे. कंपनीने ट्विटरवर जारी केल्यानुसार, चार स्थानकांची उभारणी पूर्णपणे झाली आहे. यापैकी बीकेसी व विद्यानगरी ही स्थानके पहिल्या टप्प्यातील आहेत. तर वरळी व चर्चगेट, ही दुसऱ्या टप्प्यातील स्थानके आहेत. स्थानकांची भूमिगत मार्गिका, स्थानकांमध्ये प्रवेश करण्यासाठीचा भाग, भूमिगत वायुविजन यंत्रणा, स्थानक प्रणाली आदी यंत्रणा सक्षमपणे उभी झाल्याचे दिसून येत आहे.